# वॅनबरीतर्फे कॅल्शियमच्या गोळ्या-सीडेन्स

वॅनबरी लिमिटेड स्थानिक बाजारपेठेत वेगाने वाढणाऱ्या औषध कंपन्यांपैकी एका कंपनीने ऑस्ट्रियोस्पायरोसिस आणि गायनॅकोलॉजी संबंधित कॅल्शियम कमतरता असणाऱ्या बाजारपेठेत प्रवेश केल्याची घोषणा केली. त्यांनी यासाठी आता सीडेन्स या कॅल्शियम ओरोटेट या मिनरल ट्रान्सपोर्टरच्या गोळ्या बाजारात आणल्या आहेत. सीडेन्स या गोळ्यांच्या स्वरूपात उपलब्ध असून, त्या गोळीचा एक डोस ७४० मिलीग्रॅमचा असेल. सीडेन्स हे उत्पादन १०० टक्के प्रिस्क्रिप्शन वर उपलब्ध होणार असून, ते मुख्यत्वेकरून ऑस्ट्रियोस्पायरोसिस, कंबरदुखी, रजोनिवृत्त महिला तसेच गरोदर स्त्रिया आणि विविध पोस्टपार्ट्म काळजीसाठी विशेषरूपाने तयार करण्यात आले आहे.